XII )

या संस्थेमध्ये पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी एकूण ११९५ विद्यार्थी प्रवेशित अहोत. शासनातर्फे दिल्या जाणा-या सर्व सवलती विद्यार्थ्यांना या कार्यालयामार्फत देण्यात येवून त्या सवलती सक्षम अधिका-याकडून मंजूर करुन घेतल्या जातात व त्याचेकडून प्राप्त होणारी सबसिडी सवलतीचे रक्कम विद्यार्थ्यांना अदा केली जाते.

अनुसूचित जाती/जमाती, भटक्या विमुक्त जाती/जमाती, इतर मागासवर्ग, एसबीसी या विद्यार्थ्यांना भारत सरकार शिष्यवृत्ती मिळते. अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांनासाठी प्रकल्प अधिकारी एकात्मीक अदिवासी विकास प्रकल्प आंबेगांव जि. पुणे यांचे मार्फत मंजूर केली जाते तर अन्य प्रवर्गासाठी मा. विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, सातारा यांचे मार्फत मंजूर केली जाते. एकूण ११९५ प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी अनुसूचित जाती ११९, अनुसूचित जमाती ०३, भटक्या जाती जमाती - १०४, इतर मागावर्ग २२४ एसबीसी - ०५० एकूण शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी संख्या ५०० असून त्यामध्ये फ्रीशीपचे विद्यार्थी १८८ तर शिष्यवृत्ती धारक ३१२ आहेत त्यांना शासन नियमानुसार संबंधित विभागाचे अधिकारी रकमा/ सवलती मंजूर करतात.

---